3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !



पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २८० वा ● शनिवार, ता.५ एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

इंडी जर्नल
०३ एप्रिल २०२५

**अयोध्येत १३,००० एकर जमिनीचा घोटाळा झाला आहे. केदारनाथ मंदिरातून ३०० किलो सोनं गायब झालं आहे. यांना हिंदूंच्या मालमत्ता सांभाळता येईनात आणि हे चालले मुस्लिमांच्या जमिनीची रक्षा करायला.”**



**संजय राऊत**
राज्यसभा खासदार, शिवसेना

गुरुवारी राज्य सभेत वक्फ विधेयकावर सुरु असलेल्या चर्चेदरम्यान बोलताना. यावेळी बोलताना संजय राऊत म्हणाले की भाजप सरकार व्यापारी प्रवृत्तीचं आहे. “तुम्ही व्यापारी प्रवृत्तीचे आहात, तुम्हाला फक्त विकायचं कळतं. आता तुमचा जमिनींवर डोळा आहे, त्या विकण्यासाठी तुमचा खटाटोप सुरु आहे.”

Friends of Rayat Samachar
इंडि जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा.

## लोकनाराजी दूर करण्यासाठी भुषण गगराणी यांनी घेतली बैठक

### सिमेंट कॉंक्रिट रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणात सुरु


### मनपा प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका



**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या सिमेंट कॉंक्रिट रस्ते प्रकल्पाची अंमलबजावणी वेगात होण्याच्या दृष्टिने महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी आज रस्ते कामांचा कंत्राटनिहाय आढावा घेतला.

मुंबई महानगरात सिमेंट कॉंक्रिट रस्ते बनविण्याची कामे व्यापक स्वरूपात सुरू आहेत. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. मात्र, ही टीका सकारात्मकपणे घ्यावी, संधी व आव्हान म्हणून तिच्याकडे पाहावे. सध्या सुरु असलेली कॉंक्रिटीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण केली तर खड्डे निर्माण होण्याच्या समस्येचे प्रमाण कमी होईल. रस्ते जोडणीत वाढ होऊन मुंबईकरांचा प्रवास अधिक सुकर होईल. मुंबईकरांना सुखद अनुभव मिळेल, असे प्रतिपादन यावेळी गगराणी यांनी यावेळी केले. ते पुढे म्हणाले, कॉंक्रिटीकरणाची कामे अधिक गतीने करताना गुणवत्तेशी तडजोड कदापि खपवून घेणार नाही. दिनांक ३१ मे २०२५ नंतर एकही रस्ता अपूर्ण अवस्थेत आढळता कामा नये. जर, एखादा रस्ता अपूर्णावस्थेत आढळला तर संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कठोर स्वरूपाची कारवाई केली जाईल. दोन महिन्यांच्या कालावधीत विद्यमान सुरु असलेली कामे पूर्ण करणे शक्य आहे. रस्ते कामे सुरू असताना कंत्राटदारांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्तारोधक (बॅरिकेडिंग), प्रदूषण टाळण्यासाठी हिरवे कापडी आच्छादन (ग्रीन नेट) चा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. कामे होत असताना काही कमतरता राहिल्यास कंत्राटदारांनी सजग राहून तात्काळ दुरुस्ती करावी. कंत्राटदार दुर्लक्ष करत असेल किंवा जाणीवपूर्वक चुकीच्या गोष्टी करत असेल तर कठोर स्वरूपाची कारवाई केली जाईल, असे देखील गगराणी यांनी स्पष्ट केले. महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, उपायुक्त (पायाभूत सुविधा) शशांक भोरे, प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) गिरीश निकम यांच्यासह संबंधित अधिकारी, कंत्राटदारांचे प्रतिनिधी, विविध सेवा संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## राजस्थान, ओडिशा राज्य स्थापना दिवस संयुक्तपणे साजरा

### संस्कृती-परंपरांचा आदर केल्यास लोकांमधील एकात्मता वाढेल- सी. पी. राधाकृष्णन

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ उपक्रमांतर्गत राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थान आणि ओडिशा या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस राजभवन मुंबई येथे संयुक्तपणे साजरा करण्यात आला.

राज्यांनी परस्परांच्या संस्कृती-परंपरांचा आदर केल्यास लोकांमधील एकात्मता वाढेल व सर्वांनी एकदिलाने राष्ट्रासाठी योगदान दिल्यास एक भारत श्रेष्ठ भारत निर्मितीचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

या कार्यक्रमात सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य व लोकगीतांच्या माध्यमातून राजस्थान व ओडिशा राज्यांच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

## शेअर बाजारामध्ये जोरदार घसरण; गुंतवणूकदारांमधे खळबळ




**वॉशिंग्टन । प्रतिनिधी**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारी भागीदारी देशांमधून होणाऱ्या आयातीवर भरमसाठ कर लागू केला. त्यामुळे अमेरिकेतील शेअर बाजारांमध्ये जोरदार घसरण होऊन ते दोन वर्षातील नीचांकी पातळीवर आले असल्याने गुंतवणूकदारांमधे खळबळ माजली. अमेरिकी रोखे बाजारांनी दुपारपर्यंत २ पूर्णांक सात लाख कोटी डॉलर्स बाजार भांडवल गमावल्याचं वॉलस्ट्रीटच्या बातमीत म्हटले आहे. डाऊ इंडस्ट्रियल्स बाजार निर्देशांकात तेराशे अंकांची घसरण झाली तर नॅसडॅक ६ टक्क्यांनी कोसळला तर डाऊ जोन्स दिवसाखेरीस जवळपास ४ टक्क्यांनी घसरलेला आहे. तत्पूर्वी दिवसाच्या सुरुवातीला आशियापासून युरोपपर्यंतच्या सर्व वित्तीय बाजारपेठांमध्येही जोरदार पडझड सुरू झाली. तेलाच्या किंमतीमध्येही प्रती बॅरल २ डॉलर्सहून अधिक घट झाली. जागतिक व्यापार संघटनेने या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जाणकारांकडून यावर्षी एकूण व्यापारात १ टक्का घट होण्याची शक्यता वर्तवली आहे.

## जाईबाई रुपनर यांचे निधन



**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

तालुक्यातील रुपनरवाडी येथील रहिवाशी जाईबाई तुकाराम रुपनर यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले.

मृत्युसमयी त्यांचे वय सुमारे ८५ होते. रुपनरवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते व पंढरीचे वारकरी तुकाराम रुपनर यांच्या त्या अर्धांगिनी होत्या. विवाह झाल्यानंतर सुरुवातीला एकत्रित व नंतर विभक्त कुटुंबाचा त्यांनी मोठ्या नेटाने व सचोटीने प्रपंच केला.

त्यांच्या जाऊबाई तथा माजी सरपंच छबुबाई मच्छिंद्र रुपनर यांच्याशी त्यांचे बहिणीसारखे नातेसंबंध होते. हल्ली अतिशय दुर्मिळ असलेला हा प्रकार सर्वत्र आवर्जुन चर्चिला जात असे.

बुधवार ता. ०२ एप्रिल रोजी त्यांच्या मळ्यात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी रुपनरवाडी गावासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाठीशी पती तुकाराम रुपनर यांच्यासह दोन मुले, तीन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

## हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चनांनी एकोपा टिकवून ठेवण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

### वक्फ बोर्ड नसल्याने सुधारणा विधेयकाचा राज्यावर परिणाम नाही



**पणजी । प्रतिनिधी**

गोव्यात वक्फ बोर्ड किंवा अशा बोर्डाची कोणतीही मालमत्ता नाही. त्यामुळे संसदेत मंजूर झालेल्या वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाचा राज्यावर कोणताही परिणाम होणार नाही. राज्यातील हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि इतर सर्वच धर्मियांनी गुण्यागोविंदाने राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. पर्वरी येथील मंत्रालयात शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वक्फ बोर्डाकडून गेल्या काही वर्षांपासून देशभरातील अनेक ठिकाणच्या मालमत्तांवर दावा करण्यात येत आहे.

त्यामुळेच केंद्र सरकारने यासंदर्भातील कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. इतिहासात प्रथमच वक्फ बोर्डावर महिलांची नेमणूक करण्याचा निर्णय घेऊन केंद्र सरकारने महिलांना न्याय मिळवून दिला आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या या निर्णयाचे आपण स्वागत करीत आहे. केंद्र सरकारने हा निर्णय कोणत्याही धर्माविरुद्ध नाही, तर देशहितासाठी घेतला आहे.

त्यामुळे गोव्यातील मुस्लिम बांधवांनीही या विधेयकाचे स्वागत करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. दरम्यान, गोव्यात वक्फ बोर्ड नाही. किंबहूना अशा बोर्डाची कोणती मालमत्ताही नाही. त्यामुळे संसदेत मंजूर झालेल्या याबाबतच्या विधेयकाचा गोव्यावर कोणताही परिणाम होणार नाही. राज्यात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माचे लोक आतापर्यंत गुण्यागोविंदाने नांदत आहेत.

हा एकोपा पुढील काळातही अशाच पद्धतीने कायम राहणे महत्त्वाचे आहे, असेही मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी नमूद केले.



## नुकसान भरपाईसाठी अधिकाऱ्यांची गाडी जप्तीचा न्यायालयाचा आदेश

**बेळगाव । प्रतिनिधी**

हिरेबागेवाडी गावातील सरकारी रुग्णालयासाठी ६० वर्षांपूर्वी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या भरपाईप्रकरणी महत्त्वपूर्ण निर्णय देत, बेळगाव जिल्हा सत्र न्यायालयाने आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचा आदेश दिला. हिरेबागेवाडी येथे सरकारी रुग्णालयाच्या बांधकामासाठी ६० वर्षांपूर्वी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या भरपाईबाबत न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. ब्रिटिशकालीन १८९४ च्या कायद्यानुसार, सर्व्हे क्रमांक १२५/२बी मधील फकीरप्पा दुर्गाप्पा तळवार यांची ३१ गुंठे, मल्लिकार्जुन तळवार यांची १ एकर २ गुंठे आणि अशोकाताई तळवार यांची ३० गुंठे जमीन संपादित करण्यात आली होती. मात्र, अद्यापही जमीन मालकांना भरपाई मिळालेली नाही. या संदर्भात न्यायालयाने जिल्हा आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचा आदेश दिला. आदेशानंतर, संबंधित गाडी जप्त करण्यात आली असली तरी काही कर्मचाऱ्यांनी गाडी घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच वकिलांनी हा न्यायालयाचा अपमान असल्याचे सांगत संबंधित अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर केले. यावेळी वकील आर. यांनी गाडीच्या चाव्या तातडीने सुपूर्द केल्या, तर एन. पाटील यांनी ती अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिली. हा संपूर्ण प्रकार जिल्ह्यात चांगलाच चर्चेचा विषय ठरला असून, न्यायालयाच्या आदेशानंतर आरोग्य विभागाच्या भूमिकेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## मनपाचे पाणी कनेक्शन तात्काळ तोडण्याचे एल.एस. भांड यांचे आदेश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील महत्त्वाच्या अशा साईमिडास या प्रकल्पाचा २४ तासांमध्ये विद्युत पुरवठा खंडीत करण्यात यावा तसेच महानगरपालिकेने या प्रकल्पाला दिलेल पाण्याचे कनेक्शन तात्काळ तोडण्याचे आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नाशिक विभागाचे प्रमुख एल.एस. भांड यांनी दिले. मनमाड महामार्गावर दूधसंघाच्या जागेमध्ये बेकायदेशीररित्या साई मिडास ही बिल्डिंग उभारण्यात आली होती.

या संदर्भामध्ये माजी नगरसेवक दीप चव्हाण यांनी येथील ज्येष्ठ विधिज्ञ अभिजीत पुप्पाल यांच्यामार्फत सुरुवातीला अहमदनगर येथे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्रदूषण महामंडळाकडेसुद्धा या संदर्भामध्ये तक्रार दाखल केली होती. साई मिडास बांधताना महानगरपालिकेमध्ये यांनी विकासभार सुद्धा भरलेल्या नव्हता ही बाब अत्यंत महत्त्वाची होती. दीप चव्हाण यांनी याबाबत तक्रार केल्यानंतर संबंधित एजन्सीने महानगरपालिकेकडे त्यावेळेला सुमारे सात कोटी रुपये विकासभाराचे भरले होते, त्यामुळे पालिकेचे नुकसान टळले होते. तात्कालिन प्रकरणामध्ये आयुक्त, नगररचनाकार व सासवडकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. अहमदनगर-मनमाड महामार्गावरील जिल्हा दूध संघाच्या जागेत साई मिडासच्यावतीने उभारण्यात येत असलेल्या इमारत बांधकाम प्रकल्पासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाची परवानगी न घेतल्याने हे बांधकाम थांबवण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले होते. बांधकाम असेल तर हरित लवाद आयोग व प्रदूषण नियंत्रण मंडळाची रितसर परवानगी घ्यावी लागते. ती घेतली गेली नसल्याची तक्रार त्यांनी केली होती. त्याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाला भेट देऊन तपासणी केली. त्यानंतर बांधकाम थांबवण्याचे निर्देश प्रादेशिक अधिकारी एल.एस. भांड यांनी दिले होते. यावेळी प्रदूषण महामंडळाकडे लेखी मुद्दे मांडताना वकील पुप्पाल यांनी सदर जागेचा वापर हा गैररित्या करण्यात आलेला आहे तसेच कोणत्याही प्रकारे योग्य अशी परवानगी न घेता कोणत्या प्रकारचे नियमाचे पालन संबंधिताने केलेले नाही, ही बाब त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. त्यानंतर प्रदूषण मंडळाने संबंधित साई मिडास याला दिलेले विजेचे कनेक्शन हे २४ तासाच्या तोडावे तसेच महानगरपालिकेच्या आयुक्त यांनी या बिल्डिंगसाठी देण्यात आलेले पाण्याचे कनेक्शन सुद्धा तोडावे अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत. त्याबाबतच्या आदेश येथील प्रशासनाला प्राप्त झालेले आहे.

दरम्यान साई मिडस बिल्डिंगच्या संदर्भामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अनियमियता झाली असल्याचा प्रकार दीप चव्हाण यांनी उघड केलेला होता. त्यानंतर येथील महानगरपालिका प्रशासनाकडे त्यांनी या प्रकरणाकडे लिखित तक्रारसुद्धा या अगोदर दाखल केलेली आहे. त्याची पुढील प्रक्रिया सध्या सुरू आहे. तत्पूर्वी या बिल्डिंगसाठी जे काही नियम व अटी होत्या त्याचे उल्लंघन झाले ते दिसून आले म्हणून प्रदूषण महामंडळाकडे दाखल झालेल्या प्रकरणावर आता हा निर्णय झाल्यामुळे प्रशासनाला आता ही कारवाई तात्काळ करावी लागणार आहे. महानगरपालिका प्रशासक यशवंत डांगे हे गरीबांच्या झोपड्यांवर प्रत्यक्ष जावून अतिक्रमण काढण्यासाठी बेकायदेशिर दमदाटी करतात, तशी येथे काय कारवाई करतात की रिमोट कंट्रोलवर चालतात हे अहिल्यानगरकर पहाणार आहेत.

## कस्तुरीबाई देवढे यांचे निधन



**पाथर्डी । राजेंद्र देवढे**

मोहोज देवढे ग्रामपंचायतीचे तब्बल दोन दशके सरपंच राहिलेले स्वर्गीय युवराज पाटील देवढे यांच्या अर्धांगिनी कस्तुरीबाई देवढे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७८ होते.

स्वर्गीय बाबुराव ढोले पाटील व गंगूबाई यांच्या पोटी जन्मलेल्या कस्तुरीबाई, या वैभवशाली कुटुंबातील पहिलंच अपत्य असल्याने मोठ्या लाडाकोडात वाढल्या. त्यांच्या जन्मदात्री मातेचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांची दुसरी माता शहाबाई यांनी त्यांचा जीवापाड सांभाळ केला. तत्कालीन सत्यशोधक चळवळीचे खंदे समर्थक कॉम्रेड आसराजी पाटील देवढे यांचे कनिष्ठ सुपुत्र युवराज पाटील देवढे यांच्याशी वयाच्या अठराव्या वर्षी त्यांचा विवाह झाल्यावर त्या सासरी म्हणजेच मोहोज देवढे येथे आल्या. सासरी एकत्र कुटुंब पद्धती असली तरी अल्पावधीतच त्या त्यात समरस झाल्या. त्यांचे दिवंगत पती युवराज पाटील देवढे हे पूर्णवेळ समाजकारणात कार्यरत असताना त्यांनी, त्यांना मोलाची साथ दिली. आज दुपारी बारा वाजता त्यांच्या मळ्यात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोहोज देवढे गावातील महिला व पुरुष नागरिकांसह त्यांचे नातेवाईक व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाठीशी चार मुले, चार सुना व सहा नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# भू प्रणाम केंद्र नागरिकांसाठी अत्याधुनिक सेवा केंद्र- अविनाश मिसाळ

## चंद्रशेखर बावनकुळे राज्यातील ३० भू प्रणाम केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन




**अहमदनगर । समीर मन्यार**

जमिनीची मोजणी प्रक्रिया पारंपारिक पद्धतीमुळे वेळखाऊ आणि गुंतागुंतीची होती . यामुळे नागरिकांना अनेक अडचणी येत होत्या. या समस्याची जाण ठेवत महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख विभागाने नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे . सेतू केंद्राच्या धर्तीवर अत्याधुनिक जलद आणि पारदर्शक ई मोजणी व्हर्जन टू ही प्रणाली विकसित केली आहे. राज्यातील जिल्ह्यामध्ये ३० प्रणाम केंद्राचे उभारणी केली असून. या केंद्राचे उद्घाटन ऑनलाईन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले .या प्रणाम केंद्रामध्ये संगणीकृत मिळकत पत्रिका, सातबारा उतारा, रंगीत नकाशे, फेरफार नोंदणीचे उतारे अशाप्रकारे महत्त्वाची सर्व कागदपत्रे एकाच छताखाली सहज मिळणार आहेत. त्या माध्यमातून घरबसल्या ग्राहकांना लवकर आणि पारदर्शक सेवा मिळणार आहे. भू प्रणाम केंद्र नागरिकांसाठी अत्याधुनिक सेवा केंद्र असल्याचे प्रतिपादन भूमी अभिलेख चे जिल्हा अधीक्षक अविनाश मिसाळ यांनी केले. राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये भू प्रणाम केंद्राचे ऑनलाइन उद्घाटन पुणे येथून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. अहिल्यानगर येथे भू प्रणाम केंद्र लोगोचे अनावरण भूमी अभिलेखचे प्रभारी जिल्हाअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नगर भूमापन अधिकारी जितेंद्र भिंगारदिवे, उपअधीक्षक भूमी अभिलेख राहुरी मनीषा धिवर, संदीप गोसावी (नेवासा) ,रवी डीक्रूज शिरस्तेदार उपअधीक्षक भूमिअभिलेख (नगर), सुहास जाधव (श्रीगोंदा) आदींसह भूमी अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना मिसाळ म्हणाले की, हे भू प्रणाम केंद्र सुसज्ज असून प्रशिक्षित कर्मचारी येथे असणार आहेत. ई मोजणी व्हर्जन टू ही प्रणाली अत्यंत विकसित असून नागरिकांना मोजणीची तारीख वेळ आणि भूमापकाचे नाव तसेच शुल्क याची संपूर्ण माहिती घरबसल्या मिळणार आहे. अर्जाची सद्यस्थिती यांची संपूर्ण माहिती याद्वारे मिळणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी बोलताना नगर भूमापन अधिकारी जितेंद्र भिंगारदिवे म्हणाले की नागरिकांना एका छताखाली सर्व माहिती मिळणार आहे . ही एक वेगवान आणि पारदर्शक प्रणाली आहे .यासाठी शासनाने शासकीय शुल्क निश्चित केले असून त्यामुळे नागरिकांचा होणारा अतिरिक्त खर्च यामुळे टळणार आहे. भूमि अभिलेख कार्यालयाच्या वतीने नागरिकांचा खाजगी केंद्रांकडून होणारा अतिरिक्त खर्च थांबवण्यासाठी ई मोजणी व्हर्जन टू ही प्रणाली विकसित करण्यामागचा शासनाचा मूळ उद्देश असल्याचे ते म्हणाले.

# लोकशाहीतील न्यायव्यवस्थेवर विश्वास राखण्यासाठी कायदेशीर पावले उचलण्याची गरज– ॲड. गवळी

## जनतेच्या वतीने पीपल्स हेल्पलाईनची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत न्यायपालिका ही अत्यंत महत्त्वाची आणि विश्वासार्ह संस्था मानली जाते. मात्र, पारदर्शकतेच्या अभावामुळे भ्रष्टाचार आणि गैरवर्तनाच्या शंका निर्माण होतात आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होतो. जनतेच्या विश्वासासाठी सर्व न्यायाधीशांनी मालमत्ता जाहीर करणे अनिवार्य करण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने ॲड. कारभारी गवळी यांनी केली आहे. देशातील सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीश मालमत्ता जाहीर करत असले तरी, सर्वच न्यायाधीशांनी मग ते दिवाणी, फौजदारी किंवा इतर न्यायाधिकरणांतील असोत मालमत्ता जाहीर करणे कायद्याने बंधनकारक होणे अपेक्षित आहे.

न्यायाधीश हे सार्वजनिक सेवक असून त्यांच्याकडे आर्थिक व कायदेशीर अधिकार असतात. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सार्वजनिक असणे अत्यावश्यक आहे. निवडणुकीत निवडून आलेले नेते, प्रशासकीय अधिकारी आणि पोलिसही आपली मालमत्ता जाहीर करतात, तर न्यायाधीश याला अपवाद का? भारतीय संविधानातील कलम १४ मध्ये सर्व नागरिकांना कायद्यासमोर समानतेचा अधिकार दिला आहे, त्यामुळे न्यायाधीशांनाही जबाबदारीचे तेच निकष लागू होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता म्हणजे लोकशाहीचा मजबूत पाया आहे. सर्व न्यायाधीशांनी त्यांची मालमत्ता जाहीर केल्यास भ्रष्टाचाराचे संशय दूर होतील आणि लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल. लोकशाहीतील न्यायव्यवस्थेवर विश्वास राखण्यासाठी कायदेशीर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. पारदर्शक, जबाबदार आणि विश्वासार्ह न्यायव्यवस्था ही एका समतोल व न्याय समाजाची गरज असल्याची भावना ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली आहे. सर्व न्यायाधीशांनी मालमत्ता जाहीर करणे बंधनकारक करणारा कायदा संसदेत मंजूर केला जावा, नागरिकांनी न्यायालयात याचिका दाखल करून न्यायिक हस्तक्षेपाची मागणी करावी, माहिती अधिकाराचा उपयोग करून न्यायव्यवस्थेतील पारदर्शकतेसाठी दबाव निर्माण करावा, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनी स्वतःहून आदर्श उभा करत संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी नियम ठरण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आली आहे.

# सभासदांचा विश्वास सार्थ ठरवून पारदर्शक कामकाज केले जाणार– आप्पासाहेब शिंदे

## माध्यमिक शिक्षक सोसायटी चेअरमनपदी शिंदे तर व्हा. चेअरमनपदी वाळके



**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी आप्पासाहेब शिंदे व व्हाईस चेअरमनपदी अर्जुन वाळके यांची शुक्रवारी ता. ४ एप्रिल रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. नुकतेच पार पडलेल्या सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत स्वाभिमानी परिवर्तन मंडळाने पुरोगामी सहकार मंडळाची २८ वर्षाची सत्ता उलथावून २१/० संचालकांच्या विजयाने बहुमत मिळवले. निवडून आलेल्या संचालक मंडळाची सभा चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीची बैठक जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शुक्रवारी पार पडली. यावेळी चेअरमनपदासाठी आप्पासाहेब शिंदे व व्हाईस चेअरमनपदासाठी अर्जुन वाळके यांचे एकमेव अर्ज प्राप्त झाले. चेअरमनपदासाठी महेंद्र हिंगे, संभाजी गाडे सुचक व अनुमोदक होते. तर व्हाईस चेअरमनपदासाठी बाबासाहेब बोडखे, उमेश गुंजाळ सुचक व अनुमोदक होते. सर्व संचालकांच्या बहुमताने त्यांची निवड जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी घोषित करुन नुतन चेअरमन शिंदे व व्हाईस चेअरमन वाळके यांचा त्यांनी सत्कार केला. या निवडीनंतर सोसायटी समोर ढोल ताशाच्या गजरात जल्लोष करुन फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक मुटकुळे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे, संचालक बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, आप्पासाहेब जगताप, ईश्वर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ आदी उपस्थित होते. गणेश पुरी म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे प्रश्न समजून घेऊन टप्प्याटप्प्याने प्रश्न मार्गी लावावे. अजेंड्याप्रमाणे सभासदांच्या हिताचे कार्य करावे. मागच्या संचालक मंडळाला ज्यामुळे पराभव पत्करावा लागला त्याची पुनरावृत्ती करू नये. लेखापरीक्षण व्यवस्थित काटेकोरपणे असावे. नवीन संचालक मंडळाने कामात पारदर्शकता निर्माण करावी. तालुका निहाय गरज ओळखून त्याप्रमाणे सभासदांना सेवा द्यावी. शिक्षण, लग्न, वैद्यकीय कर्जासाठी समिती नेमून संचालक मंडळासमोर समितीने योग्य छाननी करून कर्ज प्रकरणे मंजूर करून घ्यावी. महिला सभासदांसाठी विविध योजना राबवाव्या, संस्था वाढीसाठी प्रयत्न करावे व आपला पैसा सुरक्षित असल्याची भावना व विश्वास निर्माण करण्याचा त्यांनी सर्व संचालकांना सल्ला दिला. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष दत्ता नारळे यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पाडली. चेअरमन आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, प्रत्येक सभासदाचा विश्वास सार्थ ठरवून पारदर्शक कामकाज केले जाणार आहे. प्रत्येकाशी चांगले वर्तन ठेऊन कोणत्याही प्रकारची दुही ठेवली जाणार नाही. निवडणूक संपली सर्वांना बरोबर घेऊन काम केले जाणार असून, सर्व संचालक एकजुटीने सभासद हितासाठी काम करणार आहे. निवृत्त झाल्यानंतर पुन्हा संचालक म्हणून येणार नसून, मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणार असल्याचे त्यांनी सांगितले. व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके यांनी स्वच्छ व पारदर्शक कारभार आणि सभासद हित हेच ध्येय समोर ठेऊन सर्व संचालक मंडळाचे कार्य राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीसाठी राजेंद्र लांडे, प्रा. सुनील पंडित, नंदकुमार शितोळे, शिरीष टेकाडे, रमजान हवालदार, भीमराज खोसे, सुभाष कडलग, मारुती लांडगे, ज्ञानेश्वर काळे, कल्याण ठोंबरे, बाळासाहेब सोनवणे, दीपक बुधवंत, राजू सोनवणे, माधव काटे, अनिल ठाणगे, राहुल झावरे, सुभाष गव्हाणे, आत्माराम दहिफळे, सुभाष भागवत, प्राचार्य विजय थोरात, गुलाब गाडेकर, भाऊसाहेब पगारे, गणेश इंगळे, सत्यवान थोरे, सुरेश मिसाळ, सूर्यभान दहिफळे, मिथुन डोंगरे आदी उपस्थित होते. प्राथमिक शिक्षक बँकेचे बापूसाहेब तांबे सहकारी मित्र व जळगाव शिक्षक बँकेचे संजय पवार यांनी नूतन चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि संचालक मंडळाचा सत्कार केला. यावेळी प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन संचालक मंडळाला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमजान हवालदार यांनी केले. आभार सुभाष कडलग यांनी मानले.

# वंचित बहुजन युवा आघाडीच्या शहराध्यक्षपदी ॲड. योगेश गुंजाळ

## नूतन कार्यकारिणी जाहीर



**अहमदनगर । प्रतिनिधी**

वंचित बहुजन युवा आघाडीच्या शहराध्यक्षपदी ॲड. योगेश गुंजाळ यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचप्रमाणे महासचिव पदी इंजि. रोहन परदेशी यांची नियुक्ती करुन नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. वंचित युवा आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा यांनी अहिल्यानगर शहरातील युवा आघाडीची कार्यकारणी जाहीर केली आहे. उपाध्यक्षपदी ऋतिक शिंदे, नबी अब्दुल सत्तार शेख, रोहिदास डोकडे, संघटकपदी अजित कदम, सहसंघटकपदी सुनिल दामले, सचिवपदी ईश्वर कांबळे, सहसचिवपदी अजय भोसले, सदस्यपदी बाळू शिंदे व सुनिल फुलारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. योगेश गुंजाळ गेल्या पंधरा-वीस वर्षापासून भटक्या विमुक्त समूहात काम करत आहेत. त्यांनी उपेक्षित घटकांच्या न्याय, हक्कासाठी अनेक आंदोलन, मोर्चे, उपोषण केले आहे. अनेक आंदोलन करून विविध प्रश्न मार्गी लावलेले आहेत. भारतीय टायगर फोर्स संघटनेचे शहराध्यक्ष ते जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळून अनेक सामाजिक कामे केले आहेत. वंचित बहुजन आघाडीच्या स्थापनेपासून ते पक्षात सक्रीयपणे काम करत आहे. आत्तापर्यंत त्यांनी कोणतेही जबाबदारी घेतली नव्हती, पक्षाच्या वतीने त्यांचे सामाजिक कार्य पाहून त्यांच्यावरती युवकांना संघटित करण्यासाठी युवक आघाडीच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, राज्य प्रवक्ते अरुण जाधव, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनीफ शेख, युवक जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तेजस गटणे एमबीबीएस उत्तीर्ण



**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील तेजस गटणे हा एमबीबीएस परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. त्याने पुणे येथील बी.जे. गर्व्हमेंट मेडिकल कॉलेज आणि ससून सर्वोपचार रुग्णालयातून एम.बी.बी. एस शिक्षण पुर्ण केले आहे. अहिल्यानगर येथील निखिल फोम हाऊस या फर्मचे संचालक धनंजय शरदचंद्र गटणे व मनिषा धनंजय गटणे यांचा तो मुलगा आहे.

या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जुनाट सर्दी-पडसे (Chronic Rhinitis) आणि नाकाच्या ॲलर्जीवर होमिओपॅथिक उपचार



**डॉ. विद्या गायकवाड**
दिल्लीगेट, अहमदनगर
७५८८०९२६७३

**आरोग्यवार्ता**

**होमिओपॅथीचे फायदे–** मुळापासून कायमस्वरूपी उपचार. रोगप्रतिकारशक्ती वाढविणारे औषधोपचार. रासायनिक औषधांशिवाय सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय. **प्रभावी होमिओपॅथिक औषधे–** Allium Cepa पाण्यासारखा नाक वाहणे आणि डोळ्यात जळजळ. Arsenicum Album वारंवार शिंकणे आणि थंडीत त्रास होणे. Nux Vomica धूळ किंवा हवामान बदलाने वाढणारी ॲलर्जी. Sabadilla वारंवार शिंक आणि गळ्याची खवखव. Pulsatilla चिखलयुक्त सर्दी आणि थंड वातावरणात वाढणारा त्रास. **होमिओपॅथी**

**सोबत घेण्यासारख्या काळजीच्या सवयी–** गरम पाण्याचा वाफारा घ्या. रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी ताजे आणि पोषक आहार घ्या. धूळ, धूर आणि हवामानातील अचानक बदल टाळा. होमिओपॅथिक उपचाराने सुरक्षित आणि प्रभावी परिणाम मिळवा.

**श्रीलक्ष्मी होमिओपॅथिक क्लिनिक,**
**दिल्लीगेट, अहमदनगर.**
**डॉ. विद्या गायकवाड (B.H.M.S.)**
**संपर्क : ७५८८०९२६७३**


# रयत समाचार Classified छोटी जाहिरात

## छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
**- संपर्क -**
**८८८८३४७४११**

**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
**चहा, कॉफी, लेमन टी**
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# आत्मा मालिकचे २२७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत सारथीसाठी १९२ विद्यार्थी पात्र

**कोपरगांव । किसन पवार**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला. यामध्ये आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुलाचे २२७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहे. राज्यात एका शाळेत सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा मान दहाव्यांदा आत्मा मालिकने मिळविला.

या विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपयाप्रमाणे चार वर्षासाठी ४८००० रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. २२७ विद्यार्थ्यांना ०१ कोटी ८ लाख ९६ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. आत्मा मालिकचे आज पर्यंत १६८० विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले असून त्यांनी ८ कोटी ६ लाख ४० हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तर छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी १९२ विद्यार्थी पात्र झाले असून त्यांना प्रत्येकी ३८४०० रुपयांप्रमाणे ७३ लाख ७२ हजार ८०० रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त होणार असल्याची माहिती गुरुकुलाचे प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली.

एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीमध्ये सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या शाळांमध्ये २२७ विद्यार्थ्यांसह आत्मा मालिक प्रथम असून कोल्हापूरचे पी. बी. पाटील विद्यालय १६५ विद्यार्थ्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख रविंद्र देठे, सचिन डांगे, अनिल सोनवणे, रमेश कालेकर, मिना नरवडे, बाळकृष्ण दौंड, पर्यवेक्षक सुनिल पाटील, नितीन अनाप, नयना शेटे, गणेश रासने, विषय शिक्षक अजय कांबळे, सोपान शेळके, अनिता वाणी, वैभव हारदे, अमोल कर्डिले, सुर्यकांत कऱ्हाळे, दिपाली भोसले, संदिप शिंदे, पाडूरंग वायखिंडे, ज्ञानेश्वर म्हस्के, वैशाली तांबे, पुनम खांडेकर, सोमनाथ व्यवहारे, दत्तात्रय गायकवाड, गणेश कांबळे, सचिन जगधने, सिद्धेश भोईर, करिष्मा ढेपले, शिवांजली येसेकर, मंगेश थोरात, सुनील वाणी, सुवर्णा धनवटे, राजेंद्र जाधव, शिवम तिवारी, पंकज गुरसळ, पवार रिना, वनिता लोंढे, मीना सातव, आशाा देठे, अश्विनी जावळे, सर्जे राव भुजाडे, पुनम पावसे, अंजली तिवारी, पाचारणे अमोल, पुनम राऊत, बबन जपे, राजश्री पिंगळ, सुनंदा कराळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशिर्वादासह संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, प्राचार्य निरंजन डांगे यानी अभिनंदन केले.

# चालू असलेल्या विकासकामांचे माहिती फलक लावा

## मानवता संदेश फाउंडेशनची मागणी

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहरात सध्या विविध भागांमध्ये रस्ते,गटारी व इतर स्वरूपाची विकास कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. राज्य शासनाच्या विविध निधीमधून ही कामे होत आहेत.यामध्ये लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे देखील आहेत. मार्च एंड मुळे सदर कामाचा निधी उशिरा वर्ग झाल्याने ही कामे तातडीने केली जात आहेत. मात्र जलद गतीने कामे करताना त्या कामाचा दर्जा आणि विश्वासार्हता यावर प्रश्न निर्माण झालेले आहेत. मागील वेळी झालेली कामे सहा महिन्यातच खराब झाल्याची अनेक उदाहरणे डोळ्यासमोर आहेत.त्यामुळे सध्या जी कामे होत आहेत ती कामे कोणत्या योजनेतून झाली ?, तिचे अंदाजपत्रक किती ? सदर कामाचे टेंडर कोणी घेतले ? त्या ठेकेदाराचे नाव व टिकण्याची शिकस्त मुद्दत या बाबींचा मजकूर असलेले फलक सदर कामाच्या ठिकाणी काम झाल्याबरोबर लावण्यात यावे अशी मागणी मानवता संदेश फाउंडेशन या संघटनेने नगरपालिकेकडे केली आहे. नगरपालिका हद्दीत होणारी विकास कामे मार्च एंडच्या नावाखाली थातूरमातूर होतात आणि जनतेचा पैसा वाया जातो आणि पुन्हा नागरिकांना पूर्वीच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. हे सर्व टाळण्यासाठी व कामाचा दर्जा लोकांना कळावयासाठी ही कामे ज्या योजनेतून झाली आहे त्या योजनेचे नाव, त्या कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक व काम करणाऱ्या ठेकेदाराचे नाव असा मजकूर या फलकावर असणे आवश्यक आहे आणि हा शासनाचा नियम देखील आहे.मात्र यापूर्वी असे फलक लावण्याचे टाळण्यात आले आहे. किमान प्रशासकीय राजवटीत तरी हा शिरस्ता पाळण्यात यावा व सदरचे फलक लावण्यात यावे अशी मागणी देखील मानवता संदेश फाउंडेशन ने केली आहे.

# समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आयआयटीमध्ये चमक दाखवत केले यश संपादन

**कोपरगाव । किसन पवार**



दिल्ली येथील आय.आय.टी आयोजित इडीसी अंतर्गत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या एलएफआर रोबोटिक्स स्पर्धेत कोपरगाव येथील समता इंटरनॅशनल स्कूलच्या निऑन नेव्हीगेटर्स संघाने मिळालेली संधी स्वीकारत सेकंड रनर अप चा मान मिळवत आयआयटीत समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवत यश संपादन केले आहे.

निऑन नेव्हीगेटर्स संघात दृष्टी लोकचंदानी, सिद्धेश ठोंबरे, जयेश वाघ, ॲना वेस्ली, आयुषिका कुमार, सुयश शिंदे यांचा समावेश होता. या स्पर्धेत १३८ संघांनी सहभाग नोंदविला होता. १ हजारच्या आसपास या स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले होते. नव नवीन उपक्रमांचे केंद्र असलेल्या दिल्ली येथील आयआयटी देशातील तरुणांना अमर्याद शोध घेण्यासाठी प्रेरित करत असते. या यशामुळे समता इंटरनॅशनल स्कूलच्या इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा मिळाली असून ही विद्यार्थ्यांसाठी परिवर्तनरुपी संधी निर्माण झाली आहे. यश संपादन केलेल्या या विद्यार्थ्यांना समता इंटरनॅशनल स्कूलचे आयटी विभाग प्रमुख उदय पाटील व विभागातील शिक्षकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. समता इंटरनॅशनल स्कूलच्या या यशस्वी विद्यार्थ्यांचे स्कूलचे संस्थापक काका कोयटे, कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, प्राचार्य डॉ.समीर अत्तार, कार्यालयीन अधीक्षक सुरेश शिंदे, पालक वर्ग, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कोपरगाव तालुक्यातील सर्व स्तरातून यश मिळविलेल्या या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.



# शिक्षक बँकेकडून उंडेमळा शाळेस सीसीटीव्ही भेट

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या वतीने मढेवडगाव येथील जिल्हा परिषद उंडेमळा शाळेस सीसीटीव्ही संच बसविण्यात आला. यावेळी लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ उंडे, थोर देणगीदार माणिकराव मांडे, समितीचे सदस्य मोहन गायकवाड उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रामदास ठाकर यांनी शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, मा चेअरमन डॉ संदीप मोटे यांचे तसेच सर्व संचालक मंडळाचे आभार मानले. शालेय परिसरातील शेतात बिबट्याचा वावर असल्याने सीसीटीव्ही ची गरज होती. तसेच शाळेतील विविध उपक्रम आता पालकांना पाहण्यास मदत होईल. शिक्षक बॅकेच्या या सहकार्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

# महावितरणचा गलथान कारभार; रोहित्र जळाल्याने वॉर्ड २ मध्ये निर्जळी

## आ. ओगले यांच्याकडून झाडाझडती

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

वीज वितरण कंपनीचे वार्ड क्रमांक दोन प्रभाग ९ ब मधील कुकरेजा चौकातील रोहित्र सकाळी ७ वाजता जळाल्याने संपूर्ण वार्ड नंबर दोनला आज निर्जळीला सामोरे जावे लागले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही रोहित्र बदलण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली नव्हती. याबाबत आमदार हेमंत ओगले यांच्याकडे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनीवरून माहिती देताच आमदार ओगले यांनी सदरचे रोहित्र तातडीने बदलण्या संदर्भात अधिकाऱ्यांना आदेश दिल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात आली. सायंकाळी सहा वाजता सप्लाय सुरू करण्यात आला. वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे नागरिकांना उन्हाळ्याच्या झळयांचा दिवस भर त्रास सहन करावा लागला. याबाबत वीज वितरण कंपनीच्या विरोधात महिलांबरोबरच नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत सदरचे रोहित्र बदलण्यात आले नव्हते. या सर्व त्रासाची कैफियत काही नागरिकांनी आमदार हेमंत ओगले यांच्या कानावर भ्रमणध्वनी करून घातली. आमदार ओगले यांनी वीज वितरण कंपनीच्या अभियंत्यास तातडीने फोन करत त्यांची कान उघडनी केली. यानंतर वितरण कंपनीने कामाला सुरुवात केली. दरम्यान, याबाबत माहिती घेण्यासाठी बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना कॉल केल्यानंतर त्यांचे मोबाईल बंद होते. ते सतत बंद असतात. कुकरेजा चौकातील रोहित्राबाबत नागरिकांच्या सदोदित तक्रारी आहेत. बाह्यश्रोत कर्मचारी मात्र या तक्रारीकडे फारसे लक्ष देत नाहीत. ही बाब काही नागरिक आमदार ओगले यांच्या कानावर घालणार आहेत.

दरम्यान, श्रीरामपूर नगर परिषदेच्या वतीने गेल्या काही वर्षापासून संपूर्ण वार्ड नंबर दोन मध्ये दुपारी बारा वाजन्याच्या पुढे अनियमितपणे पाणीपुरवठा करण्यात येतो. यामुळे महिलांमध्ये प्रचंड चीड आहे. श्रीरामपूर नगरपालिकेच्या स्थापनेपासून तर गेली दोन वर्ष पर्यंत सकाळी सात वाजता अखंडित पाणी सुटत होते. अलीकडे गेल्या दोन वर्षापासून कधी आहे तर कधी नाही अशा अनियमिततेने दुपारी अवेळी पाणी सुटते. वेळेचा कोणताच विचार न करता नगरपालिकेने वार्ड नंबर दोन मध्ये सुमारे सात ते आठ हजार नागरिकांना दुपारी पाणी देण्याचे नियोजन केल्याने घर आणि बाहेरील कामाची मात्र वाट लागली आहे. पाणी भरण्यासाठी घरातील महिलांना सर्व कामे सोडून थांबावेच लागते. या भागात अनेक जण रोजगाराच्या शोधात दररोज घराबाहेर बाहेर पडतात. नगरपालिकेने दुपारी पाणी सोडण्याच्या केलेल्या नियोजनामुळे मात्र या सर्वांना एका वेगळ्या त्रासाला दररोज सामोरे जावे लागत आहे. पालिकेने या भागाला सकाळीच पाणी सोडण्याचे नियोजन करावे, अशी मागणी हजारो नागरिकांची केली आहे.

# वांगदरीच्या अंबिकामातेचा यात्रोत्सव उत्साही वातावरणात

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तालुक्यातील तालुक्याची उपराजधानी समजल्या जाणाऱ्या वांगदरी येथील ग्रामदैवत अंबिका माता या ग्रामदैवतेचा यात्रोत्सव सालाबाद प्रमाणे यावर्षी २ ते ३ एप्रिल २०२५ रोजी यात्रोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात आल्याची माहिती गावचे सरपंच व यात्रा कमिटीचे अध्यक्ष संजय नागवडे यांनी दिली.या यात्रोत्सवाची अधिक माहिती देताना सरपंच संजय नागवडे यांनी सांगितले की, यात्रेच्या पहिल्या दिवशी बुधवार ता. २ एप्रिल २०२५ रोजी अंबिका मातेची विधिवत अभिषेक व महाआरती ने यात्रेची सुरवात करण्यात आली त्यामध्ये रात्री छबीना मिरवणूक डोळ्याचे पारणे फेडावे अशाप्रकारे नियोजन करण्यात आले. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी गुरुवार दिनांकता. ३ एप्रिल २०२५ रोजी मल्लांसाठी यात्रा कमिटीने कुस्ती आखाड्याचे भव्य असे आयोजन करण्यात आले होते. या आखाड्यामध्ये. तालुक्यातील आणि बाहेरील पहिलवानांनी मोठा सहभाग नोंदवला आखाड्याचा शेवट अकरा हजार रुपये बिदागी देऊन आखाड्याची



सांगता करण्यात आली. विशेष म्हणजे वजनावर कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे आणखी माहिती देताना सरपंच नागवडे यांनी सांगितले की वजन करण्यासाठी ताटाकेश्वर मंदिरात व्यवस्था करण्यात आली होती. यात्रेमध्ये कुठलाही अनुचित प्रकार न घडता यात्रा सुरक्षित व शांततेच्या वातावरणात पार करण्यात आली. यात्रा सुरक्षित पार पाडण्यासाठी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, माजी सरपंच विठ्ठलराव आप्पा नागवडे, दीपक शेठ नागवडे, आदेश शेठ नागवडे, युवा नेते दिग्विजय नागवडे, सरपंच संजय काका नागवडे, उपसरपंच काशिनाथ पारखे, महेश शेठ नागवडे, रोहिदास नागवडे, मा पोलीस पाटील सुभाष गोरे, रामचंद्र नागवडे, साहेबराव महानवर, दगडू आप्पा सोनलकर, हे शिक्षक नेते आबासाहेब जगताप, मा उपसरपंच शिवाजी चोरमले, दत्तात्रय मासाळ यांच्यासह यात्रा कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी यात्रा सुरक्षित व शांततेत पार पाडण्यासाठी मोठे परिश्रम घेतले. या यात्रा उत्सवाच्या कालावधीत अहवाल वृद्ध महिला भगिनींनी अंबिका मातेला साक्षात दंडवत घालत रांगेत सर्वांनी दर्शनाचा लाभ घेतला यात्रा निमित्त येणाऱ्या भाविकांचे यात्रा कमिटी अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, सरपंच,उपसरपंच, सदस्य, चेअरमन व्हा.चेअरमन संचालक, पाणी वापर संस्था चेअरमन संचालक, आदींनी यात्रा सुरक्षितेसाठी बहुमोल वेळ देऊन योगदान दिले यात्रा सुरक्षित व शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल यात्रा कमिटीचे अध्यक्ष सरपंच संजय नागवडे यांनी सर्वांचे आभार मानले .

# देशभक्ती रूजवणारा अभिनेता

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते.



त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# भारत कुमार उर्फ मनोज कुमार



**अभिनेता मनोज कुमार यांचे शुक्रवारी सकाळी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. ते विशेषतः त्यांच्या देशभक्तिपर चित्रपटांसाठी ओळखले जात. त्यांना भारत कुमार म्हणूनही ओळखले जात असे.त्यांच्या कारकिर्दीवर टाकलेला हा दृष्टीक्षेप...**

प्रसिद्ध अभिनेते मनोज कुमार यांच्या चित्रपटांनी बॉलिवूडमधील एक काळ गाजवला. मात्र वृद्धापकाळामध्ये त्यांना अनेक वेदना सहन कराव्या लागल्या. शेवटच्या काही दिवसांमध्ये त्यांची अगदी बिकट अवस्था होती. मनोज कुमार यांच्या निधनानंतर संपूर्ण कलाविश्वाला मोठा धक्का बसला आहे. ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कोकिलाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने कलाविश्वामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना कलाकर व्यक्त करत आहेत.कलाविश्वात असे अनेक कलाकार आहेत ज्यांनी ग्लॅमर विश्वात प्रवेश करताच त्यांची नावं बदलली. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार हेदेखील त्यापैकी एक आहेत. मनोज कुमार यांचं खरं नाव हरिकिशन गिरी गोस्वामी असं आहे. इंडस्ट्रीत पाऊल ठेवल्यानंतर त्यांनी त्यांचं नाव मनोज कुमार असं बदललं. अनेक देशभक्तीपर चित्रपटांमधून प्रेक्षकांची मनं जिंकल्यानंतर ते 'भारत कुमार' म्हणून ओळखले जाऊ लागले होते.

मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकृष्ण गोस्वामी होते. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी ब्रिटिश भारतातील अबोटाबाद (आता खैबर पख्तूनख्वा, पाकिस्तान) येथे झाला. २ मे २०११ रोजी अमेरिकेने ओसामा बिन लादेनला जिथे मारले होते तेच अबोटाबाद आहे. मनोज कुमार १० वर्षांचे असताना १९४७ मध्ये त्यांचे धाकटा भाऊ कुक्कूचा जन्म झाला. त्याची तब्येत बिघडली तेव्हा, २ महिन्यांच्या भावाला आणि आईला रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेव्हा दंगल सुरू झाली. सर्वत्र गोंधळ उडाला आणि रुग्णालयातील कर्मचारी जीव वाचवण्यासाठी पळू लागले. सायरन वाजताच, उर्वरित डॉक्टर आणि परिचारिका भूमिगत झाले. अशा परिस्थितीत, योग्य उपचारांअभावी, मनोज कुमारच्या २ महिन्यांच्या भावाचा रुग्णालयात मृत्यू झाला. त्यावेळी आईची प्रकृतीही गंभीर होती. ती वेदनेने ओरडत राहिली, पण कोणत्याही डॉक्टर किंवा नर्सने तिच्यावर उपचार केले नाहीत. एके दिवशी हे सर्व पाहून मनोज यांना इतका राग आला की त्यांनी काठी उचलली, डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण करायला सुरुवात केली. मनोज तेव्हा फक्त दहा वर्षांचे होते, पण ते त्यांच्या आईचे दुःख पाहू शकत नव्हते. वडिलांनी त्यांच्यावर ताबा मिळवला आणि कुटुंबाने आपले प्राण वाचवण्यासाठी पाकिस्तान सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांचे कुटुंब जंदियाला शेरखान येथून पळून दिल्लीला पोहोचले. येथे त्यांनी निर्वासित छावणीत २ महिने घालवले. वेळ निघून गेला आणि दंगली कमी होऊ लागल्या. कसे तरी संपूर्ण कुटुंब दिल्लीत स्थायिक झाले, जिथे मनोज शिक्षण घेऊ शकले. शाळेनंतर, त्यांनी हिंदू कॉलेजमधून पदवी पूर्ण केली आणि नोकरी शोधू लागले. एके दिवशी मनोज कुमार कामाच्या शोधात फिल्म स्टुडिओमध्ये फिरत असताना त्यांना एक माणूस दिसला. मनोज यांनी सांगितले की ते काम शोधत आहेत, म्हणून तो माणूस त्यांना सोबत घेऊन गेला. त्यांना चित्रपटाच्या चित्रीकरणात वापरले जाणारे लाइट्स आणि इतर उपकरणे वाहून नेण्याचे काम मिळाले. हळूहळू, मनोज यांच्या कामावर खूश झाल्यामुळे त्यांना चित्रपटांमध्ये सहाय्यक म्हणून काम मिळू लागले. मोठे कलाकार त्यांचे शूटिंग सुरू होण्याच्या काही मिनिटे आधी चित्रपटाच्या सेटवर पोहोचायचे. अशा परिस्थितीत, मनोज कुमार यांना सेटवर नायकाच्या जागी उभे करून नायकावर पडणारा प्रकाश तपासायला लावण्यात आले.एके दिवशी जेव्हा मनोज कुमार लाइट टेस्टिंगसाठी नायकाच्या जागी उभे राहिले. कॅमेऱ्यावर प्रकाश पडताच त्यांचा चेहरा इतका आकर्षक दिसत होता की एका दिग्दर्शकाने त्यांना १९५७च्या फॅशन चित्रपटात एक छोटीशी भूमिका दिली. भूमिका छोटी होती, पण मनोज यांनी काही मिनिटांच्या अभिनयातच आपली छाप सोडली. त्या भूमिकेमुळे मनोज कुमार यांना कांच की गुडिया (१९६०) या चित्रपटात मुख्य भूमिका देण्यात आली. पहिला यशस्वी चित्रपट दिल्यानंतर मनोज यांनी रश्मी रुमाल, चांद, बनारसी ठग, गृहस्ती, अपने हुए पराये, वो कौन थी यांसारखे अनेक बॅक टू बॅक हिट चित्रपट दिले. मनोज कुमार लहानपणापासूनच दिलीप कुमार यांचे खूप मोठे चाहते होते. मनोज कुमार यांना दिलीप साहेबांचा शबनम (१९४९) हा चित्रपट इतका आवडला की त्यांनी तो अनेक वेळा पाहिला. चित्रपटात दिलीप कुमार यांचे नाव मनोज होते. जेव्हा मनोज कुमार चित्रपटांमध्ये आले तेव्हा त्यांनी दिलीप कुमार यांच्या नावावरून त्यांचे नाव मनोज कुमार असे ठेवले.१९६५ मध्ये, मनोज कुमार यांनी शहीद या देशभक्तिपर चित्रपटात स्वातंत्र्यसैनिक शहीद भगतसिंग यांच्या भूमिकेत काम केले. हा चित्रपट खूप गाजला आणि त्यातील ए वतन, ए वतन हमको तेरी कसम, सरफरोशी की तमन्ना आणि मेरा रंग दे बसंती चोला या गाण्यांना चांगलीच पसंती मिळाली. लालबहादूर शास्त्रींना हा चित्रपट खूप आवडला. शास्त्रीजींनी जय जवान, जय किसानचा नारा दिला. शास्त्रीजींनी मनोज यांना या घोषणेवर चित्रपट बनवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर मनोज यांनी उपकार (१९६७) हा चित्रपट बनवण्यास सुरुवात केली, जरी त्यांना चित्रपट लेखन किंवा दिग्दर्शनाचा कोणताही अनुभव नव्हता. एके दिवशी मनोज कुमार यांनी मुंबईहून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी ट्रेनचे तिकीट काढले आणि ट्रेनमध्ये चढले. त्यांनी अर्धा चित्रपट ट्रेनमध्ये बसून लिहिला आणि उरलेला अर्धा परतताना लिहिला. या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शक म्हणून त्यांच्या कारकिर्दीची दुसरी इनिंग सुरू केली. नंतर त्यांनी पूरब और पश्चिम, रोटी कपडा और मकान यांसारखे देशभक्तिपर अनेक चित्रपट केले. उपकार हा १९६७ चा सर्वात मोठा चित्रपट होता. मेरे देश की धरती सोना उगले या चित्रपटातील गाणे अजूनही सर्वोत्तम देशभक्तिपर गाण्यांमध्ये गणले जाते. चित्रपटात मनोज कुमार यांचे नाव भारत होते. चित्रपटातील गाण्याची लोकप्रियता पाहून माध्यमांनी मनोज कुमार यांना भारत म्हणायला सुरुवात केली आणि नंतर ते भारत कुमार म्हणून ओळखले जाऊ लागले. मनोज कुमार यांनी दिलीप कुमार यांना दिग्दर्शित केलेला त्यांचा पहिला चित्रपट क्रांती (१९८१) होता. लाल बहादूर शास्त्री यांच्या विनंतीवरून उपकार बनवण्यात आला होता, पण ते पाहू शकले नाहीत. १९६६ मध्ये, शास्त्रीजींनी ताश्कंद (उझबेकिस्तान) ला भेट दिली. परतल्यानंतर त्यांनी उपकार हा चित्रपट पाहिला असता, परंतु ताश्कंदमध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात शांतता करारावर स्वाक्षरी केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूच्या एक वर्षानंतर, ११ ऑगस्ट १९६७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. मनोज कुमार यांना आयुष्यभर शास्त्रीजींना चित्रपट दाखवता आला नाही याबद्दल खेद राहिला. मनोज हे भारतातील एकमेव चित्रपट निर्माता असल्याचं म्हटलं जातं ज्यांनी सरकारविरुद्ध खटला जिंकला. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील प्रवेशाची कहाणीही बरीच रंजक आहे. असं म्हटलं जातं की एकदा ते कामाच्या शोधात एका फिल्म स्टुडिओमध्ये फिरत होते. त्यांनी त्यांना सांगितलं की ते काम शोधत आहेत. त्यांना इथे काम मिळालं पण चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी लागणारे दिवे आणि इतर आवश्यक उपकरणे उचलून हलवावी लागली. त्यांनी आपले काम परिश्रमपूर्वक केले आणि नंतर त्यांना चित्रपटांमध्ये सहाय्यक म्हणून काम मिळू लागलं.मनोज कुमार यांनी 'उपकार', 'पत्थर के सनम', 'रोटी कपड़ा और मकान', 'संन्यासी' आणि 'क्रांती' यांसारख्या चित्रपटांमध्येही काम केलंय. बहुतांश चित्रपटांमध्ये त्यांचं नाव 'भारत कुमार' असंच असायचं. याच कारणामुळे ते चाहत्यांमध्ये 'भारत कुमार' म्हणून लोकप्रिय झाले होते.मनोज कुमार यांचं कलाकारांसोबत राजकीय नेत्यांसोबतही चांगले संबंध होते. १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तानदरम्यान युद्ध झालं होतं आणि या युद्धानंतर मनोज कुमार यांनी लाल बहादूर शास्त्री यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान शास्त्रींनी मनोज कुमार यांना युद्धामुळे होणाऱ्या त्रासाबद्दल चित्रपट काढण्यास सांगितलं होतं. त्यावेळी मनोज कुमार यांना चित्रपट बनवण्याविषयीचा तेवढा अनुभव नव्हता. तरीही त्यांनी 'जय जवान जय किसान'शी संबंधित 'उपकार' हा चित्रपट बनवला. प्रेक्षकांना हा चित्रपट खूप आवडला होता. उपकार, पूरब-पश्चिम, क्रांती, रोटी-कपडा और मकान हे त्यांचे यशस्वी चित्रपट होते. मनोज कुमार यांना ७ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. पहिला फिल्मफेअर पुरस्कार १९६८ मध्ये उपकार चित्रपटासाठी मिळाला. उपकार ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद असे चार फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१६ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मनोज कुमार यांचा राजा खोसला यांचा १९६४ मधला मिस्ट्री थ्रिलर असलेला वो कौन थी? सुपरहिट ठरला. या चित्रपटातील लग जा गले आणि नैना बरसे रिमझिम ही गाणी प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. ही दोन्ही गाजलेली गाणी लता मंगेशकर यांनी गायली होती. मनोज कुमार यांचे वह कौन थी, पूरब और पश्चिम, शोर, हरियाली और रास्ता, गुमनाम, शहीद, पत्थर के सनम, सावन की घटा, क्रांति हे सिनेमे अत्यंत सुपरहिट ठरले. शहीद सिनेमातील त्यांच्या शहीद भगतसिंहांच्या भूमिकेचं तत्कालिन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनीही कौतुक केलं होतं.



**आशिष निनगुरकर**
९०८२४७१९१२

मनोज कुमार यांचे अनेक चित्रपट हे देशभक्तीचं महत्त्व सांगणारे होते. त्यामुळे त्यांना लोक भारत कुमार म्हणू लागले होते. हे नाव त्यांनाही खूप आवडलं होतं आणि त्यांनी ते आयुष्यभर मिरवलं. रोटी कपडा और मकान या चित्रपटातील त्यांची भूमिकाही गाजली. तसंच त्यांच्यावर चित्रित झालेली अनेक गाणी आजही लोकांच्या स्मरणात आहेत. क्रांती या चित्रपटात त्यांनी दिलीप कुमार यांच्यासह काम केलं. या चित्रपटात हेमा मालिनी, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर, परवीन बाबी, सारिका, प्रेम चोपडा अशी तगडी स्टारकास्ट होती. हा चित्रपटही त्यातल्या गाण्यांमुळे सुपरहिट ठरला होता. या चित्रपटाचं दिग्दर्शन मनोज कुमार यांनी केलं होतं. तर त्यात मुख्य भूमिकाही साकारली होती. उपकार, क्रांती यांसह अनेक चित्रपटांमधून त्यांनी भूमिका केल्या. दिग्दर्शनही केलं. त्यांना भारत कुमार असंही म्हटलं जाई ते याच कारणामुळे. त्यांच्या चित्रपटांमधली गाणी आजही लोकांच्या स्मरणात आहेत.

मनोज कुमार यांनी १९५७ मध्ये चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवलं. तिथपासून पुढची ३८ वर्षे म्हणजे जवळपास चार दशकं ते काम करत होते. १९९५ मध्ये आलेला मैदान ए जंग हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला. त्यानंतर त्यांनी चित्रपटांमधून काम केलं नाही. शोर, क्रांती, क्लर्क, रोटी कपडा और मकान, जय हिंद, उपकार या चित्रपटांमध्ये त्यांनी दिग्दर्शकाची आणि संकलकाची भूमिकाही पार पडली. शोर या सिनेमातील इक प्यार का नगमा है हे गाणंही आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत.मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे, मोती या गाण्याशिवाय तर १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे दोन राष्ट्रीय सण साजरेही होत नाहीत. आपल्या अभिनय आणि चित्रपटांमधून देशभक्तीची गोडी लावणारा हा कलाकार आता काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांना मनापासून सलाम आणि

**भावपूर्ण श्रद्धांजली.**

*(लेखक चित्रपट अभ्यासक आहेत.)*

# काचोळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवली

## १४, ५९,२००/- रुपयांची शिष्यवृत्ती

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

रयत शिक्षण संस्थेचे डी डी काचोळे माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक कामगिरी करत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयाचे एकूण २० विद्यार्थी एन एम एम एस शिष्यवृत्तीसाठी तर १३ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. विद्यालयाच्या इतिहासात प्रथमच विद्यालयाने एवढे मोठे यश संपादन केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विद्यालय या परीक्षेत तृतीय क्रमांकावर आहे. सदर परीक्षेमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकूण १४ लाख ५९ हजार २०० रुपयांची शिष्यवृत्ती पुढील शिक्षणासाठी मिळवली आहे. एन एम एम एस परीक्षेमध्ये शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढील प्रमाणे :- अहिरे प्रशांत सुरेश, चौथे वेदिका शैलेश, धवन शार्दुल मंगेश, भोसले मानस संदीप, सुरूडे मानसी जीवन, पालवे शौर्य विशाल, भाकरे मोक्षदा प्रदीप, धनेधर अनुष्का संदीप, अभंग भक्ती अप्पासाहेब, सोनवणे कृतार्थ राहुल, शेख सरताज जावेद, शेरकर सृष्टी मनोज, काटे ओमकार विजय, साळुंके वैभवी सोमनाथ, बोर्डे संस्कार विजय, भोये चेतन सुरेश, करोडेवाल सिद्धांत योगेश, सोनवणे स्वरांजली सचिन, साळवे अनिकेत परशुराम, शिंदे श्रावणी किशोर. सारथी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढील प्रमाणे :- मोरे पुष्कर धनंजय, गवारे श्रेया दिनेश, भांड स्पर्श सचिन, कोरडे प्रथमेश राजेंद्र, वाघ राधिका दत्तात्रय, साताळकर साई बाळू, काळे दर्पण सचिन, परतुडकर दर्शन बाबासाहेब, उगले भक्ती दत्तात्रय, आहेर यश संदीप, शेटे श्रीराज शरद, कोठुळे प्रणाली कैलास, गुलदगड वृषाली अजय. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख सोपान नन्नावरे व नीलिमा गेडाम तसेच भाऊसाहेब लोंढे, विपुल गागरे, स्नेहा निंबाळकर, मनीषा घावटे, रीना जोशी, अनिता सातव, सुनील खाडे आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले . या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम, उत्तर विभागीय अध्यक्ष आ.आशुतोष काळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, उत्तर विभागीय गुणवत्ता कक्षाचे प्रमुख काकासाहेब वाळुंजकर, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे व बाबासाहेब नाईकवाडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल साळवे, पर्यवेक्षक सूर्यकांत सराटे, वसतिगृह अधीक्षक महेंद्र भराड, अध्यक्ष व सर्व सदस्य स्थानिक स्कूल कमिटी, पालक शिक्षक व माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या या नेत्रदीपक यशाबद्दल पालक वर्ग व समाजातील सामाजिक संस्था यांच्याकडून कौतुक व समाधान व्यक्त केले जात आहे तसेच यशस्वी विद्यार्थी, पालक व विद्यालयाचे मुख्याध्यापक व स्टाफ यांचे अभिनंदन केले.

## विधानपरिषदेत गाजली कविदिप यांची कविता

# मंत्री जयकुमार रावळ यांचे बहारदार सादरीकरण

**मुंबई । आशिष निनगुरकर**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करावा, असा ठराव आज विधानपरिषदेत सर्वसंमतीने मंजूर करण्यात आला. हा ठराव भारत सरकारकडे पाठवण्यात आला असून, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे.

ठराव मांडताना यांनी ठाणे येथील तरुण कवी दीपक भिकन सोनवणे (कवीदिप) यांची कविता सभागृहात सादर केली. या कवितेत फुले दाम्पत्याच्या समाजसुधारणेसाठी केलेल्या अतुलनीय योगदानाचा गौरव करण्यात आला आहे. या ठरावामुळे महाराष्ट्रातील अनेक सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक आणि विचारवंतांनी समाधान व्यक्त केले आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडवली. त्यांचे कार्य भारतरत्नच्या योग्यतेचे असल्याचे सर्वच स्तरातून मान्य केले जाते. मंत्री जयकुमार रावळ यांनी सभागृहात सादर झालेल्या कवी दीपक सोनवणे यांच्या कवितेने या ऐतिहासिक क्षणी विशेष रंगत आणली. त्यांच्या या काव्यरचनेचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.





**कविता**

**क्रांतीचा सूर्य तळपला, त्याने क्रांतीज्योत चेतवली**
**समाज सुधारला ऐसा की, मुलगी-मुलगी शिकू लागली**
**जातीपातीवर घातला घाव, सत्यशोधक समाज स्थापिला**
**पुनर्विवाहाची संकल्पना मांडून, वनवास विधवांचा संपवीला**
**आल्या वाटेत अनेक अडचणी, तरीही करत राहिले प्रयत्न**
**सावित्रीबाई, ज्योतिबा फुले जोडी, खऱ्या अर्थाने आहेत भारतरत्न**

**कवी दीपक सोनवणे**